# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.04.2025** **वार:सोमवार**

---

१.पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्र्वभूमीवर संरक्षण मंत्र्यांनी सरसेनाध्यक्षांसोबतच्या भेटीत घेतला सैन्याच्या तयारीचा आढावा

२.भारत सोडून जाण्यासाठी दिलेली मुदत संपण्यापूर्वी अटारी-वाघा सीमेवरून पाचशेहून अधिक पाकिस्तानी माघारी

३.पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर चर्चा करण्यासाठी जम्मू-काश्मीर विधानसभेचं आज एक दिवसाचं विशेष अधिवेशन

४.राष्ट्रपतींच्या हस्ते आज पद्म पुरस्कारांचं वितरण आणि

५.आशियाई योगासन अजिंक्यपद स्पर्धेत ४३ सुवर्णपदकांसह भारताचं निर्विवाद वर्चस्व

**<u>राजनाथसिंहसीडीएस</u>**

संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी काल दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांची भेट घेतली. पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रतिसाद देण्याच्या अनुषंगानं सैन्य दलांच्या तयारीचा आढावा घेण्यासह अन्य महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी झालेली ही भेट जवळपास ४० मिनिटं सुरू होती. २२ एप्रिलला झालेल्या या हल्ल्यात विविध राज्यातले २६ पर्यटक मारले गेले. जनरल चौहान यांनी या बैठकीत संरक्षण मंत्र्यांना दहशतवादाचा नायनाट करण्यासाठी लष्करानं आताच्या या घडीला आखलेली व्यूहरचना आणि युद्धसज्जतेसंदर्भात माहिती दिल्याचं सूत्रांनी सांगितलं. संरक्षण सज्जतेबाबत काल दिल्लीत गृह मंत्रालयातही बैठक झाली, त्या बैठकीला सीमा सुरक्षा दलाचे अधिकारीही उपस्थित होते. दरम्यान भारतीय नौदलाद्वारे नौकाविरोधी क्षेपणास्त्रांचा प्रतिकार करण्याचा यशस्वीरीत्या सराव करण्यात आला. कुठल्याही क्षणी, कुठल्याही स्थळी युद्धासाठी नौदल सज्ज असल्याचं यावेळी सांगण्यात आलं.

**<u>गोळीबार</u>**

दरम्यान, जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण रेषेच्या भागात पाकिस्तानी सैन्यानं काल रात्री केलेल्या गोळीबाराला भारतीय सैन्यानं चोख प्रत्युत्तर दिलं. कुपवाडा आणि पूंछ भागातील नियंत्रण रेषेवर असलेल्या पाकिस्तानी सैन्याच्या चौक्यांमधून रात्री अचानक गोळीबार सुरू करण्यात आला. त्याला भारतीय सैनिकांनी तत्काळ आणि प्रभावी प्रत्युत्तर दिल्याचं संरक्षण खात्याच्या सूत्रांनी सांगितलं.

**खासअधिवेशन**

जम्मू - काश्मीरच्या मंत्रिमंडळाच्या विनंतीवरून, नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर चर्चा करण्यासाठी आज विधानसभेचं एक दिवसाचं विशेष अधिवेशन बोलावलं आहे. यामध्ये दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना विधानसभेत श्रद्धांजली वाहण्यात येईल, त्यानंतर या घटनेवर आणि संबंधित मुद्द्यांवर चर्चा होईल, तसंच या घटनेचा तीव्र निषेध करणारा ठराव मंजूर करण्यात येईल.

**ओमरपाठिंबा**

दहशतवाद आणि त्याचं मूळ यांचा बिमोड करण्यासाठीच्या निर्णायक लढाईला आपला पूर्ण पाठिंबा असल्याचं जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी म्हटलं आहे. तथापि पहलगाम दहशतवादी हल्ल्यात निरपराध लोकांचा बळी गेल्याबद्दल चिंता व्यक्त करणाऱ्यांना परकेपणा वाटेल अशा कोणत्याही स्वरुपाची अस्थानी कारवाई होऊ नये अशी चिंताही त्यांनी वक्तव्य केली आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीर खोऱ्यातील दहशतवाद्यांची यंत्रणा उखडून टाकण्यासाठी सक्रिय दहशतवादी आणि त्यांच्या भूमीगत कार्यकर्त्यांच्या घरांवर धडक कारवाई करत नऊ घरं पाडून टाकण्यात आली असताना तसंच शेकडो लोकांची चौकशी सुरू असताना उमर यांनी हे वक्तव्य केलं आहे.

**पाकिस्तानीमाघारी**

सार्क व्हिसावर भारतात आलेल्या पाकिस्तानी नागरिकांना देश सोडून जाण्यासाठी देण्यात आलेली ४८ तासांची मुदत काल संपली. तत्पूर्वी ही मुदत संपण्याच्या काही तास आधीपर्यंत पंजाबमधील अमृतसर इथल्या अटारी-वाघा सीमेवरच्या संयुक्त चौकीवरून एकंदर ५३७ पाकिस्तानी त्यांच्या देशात परतले. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी २३ एप्रिलला झालेल्या मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषक समितीच्या बैठकीत पाकिस्तानी नागरिकांना देश सोडून जाण्याचा आदेश देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. वैद्यकीय व्हिसावर आलेल्या पाकिस्तानींना देश सोडून जाण्यासाठी २९ एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, असं पंजाबमधील आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे. दरम्यान काल संध्याकाळपर्यंत एकंदर 1 हजार 387 भारतीयही पाकिस्तानातून देशात परतले आहेत.

**नोंदणीरद्द**

चारधाम यात्रा आणि हेमकुंड साहीब यात्रेसाठी नोंदणी केलेल्या ७७ पाकिस्तानी नागरिकांची नोंदणी उत्तराखंड सरकारनं रद्द केली आहे. राज्याचे पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य मंत्री सतपाल महाराज यांनी काल ही घोषणा केली. दहशतवाद आणि पर्यटन हातात हात घालून जाऊ शकत नाहीत, असं त्यांनी स्पष्ट केलं. राज्य सरकार सर्व भाविकांना सुरक्षिततेची हमी देण्यासाठी कटीबद्ध असल्याचंही ते म्हणाले. चारधाम यात्रेसाठी २२ लाख भाविकांनी नोंदणी केली असून यात इतर देशातल्या २५ हजार भाविकांचा समावेश असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<u>पद्म पुरस्कार</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज संध्याकाळी राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात पद्म पुरस्कारांचं वितरण करण्यात येणार आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना दिले जाणारे पद्म पुरस्कार हा देशातला सर्वोच्च नागरी सन्मान मानला जातो. कला, सामाजिक कार्य, सार्वजनिक व्यवहार, विज्ञान आणि अभियांत्रिकी, व्यापार आणि उद्योग, वैद्यक, क्रीडा, प्रशासकीय सेवा अशा विविध वर्गवारीत हे पुरस्कार दिले जातात. यावर्षीच्या प्रजासत्ताक दिनी सरकारनं १शे ३९ जणांना पद्म पुरस्कार जाहीर केले होते. त्यामध्ये सात पद्मविभूषण, १९ पद्मभूषण आणि ११३पद्मश्री पुरस्कारार्थींचा समावेश आहे. पद्मविभूषण पुरस्कार विजेत्या नामवंतांमध्ये प्रख्यात व्हायोलिनवादक आणि संगीतकार डॉक्टर एल सुब्रमण्यम, पोटाच्या विकारांचे तज्ज्ञ डॉक्टर डी नागेश्वर रेड्डी यांचा समावेश आहे. तर ख्यातनाम संपादक आणि प्रसार भारतीचे अध्यक्ष ए सूर्यप्रकाश, चित्रपट अभिनेते अनंत नाग, नंदमुरी बालकृष्ण आणि एस. अजित कुमार पद्मभूषण विजेत्यांमध्ये आहेत.

**<u>कर्करोगनड्डा</u>**

येत्या वर्षात कर्करोगाच्या उपचारांवर अधिक लक्ष केंद्रीत केलं जाणार असून, देशात मोठ्या प्रमाणावर उपचार सुविधा निर्मितीवर भर देणार असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी काल महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर इथं सांगितलं. शासकीय कर्करोग रुग्णालयातल्या ट्रू बीम युनिट या कर्करोगावरील अतिविशेष उपचार देणाऱ्या अत्याधुनिक यंत्र प्रणालीचं आणि कर्करोग संस्थेच्या इमारतीच्या विस्तारीत इमारतीचं लोकार्पण करताना ते बोलत होते. कर्करोगाचं निदान वेळेवर आणि लवकर करण्यासह ९० टक्के रुग्णांवर एक महिन्याच्या आत उपचार सुरू करण्यात आल्याचंही नड्डा यांनी सांगितलं. कर्करोग ही प्राधान्याची बाब ठरवून २०० निगा केंद्रं उभारली जाणार आहेत. निदान क्षमता वाढवल्यानं मुखाचा कर्करोग, महिलांमधला स्तनांचा कर्करोग यांचं वेळेत निदान झाल्यानं वेळेत उपचार सुरू होऊ शकल्याची माहितीही नड्डा यांनी यावेळी दिली.

गोयल-**<u>आरोग्यपरिषद</u>**

भारताचं पुढील २५वर्षांत ३० ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था होण्याचं उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी देशाला निरोगी नागरिकांची साथ मिळणं आवश्यक असल्याचं मत केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी काल नवी दिल्लीत व्यक्त केलं. जागतिक आरोग्य परिषदेत गोयल बोलत होते. आपल्या सरकारचा प्रत्येक उपक्रम आणि योजना अंतिमत: नागरिकांचं आरोग्य आणि सर्वांगीण विकास हेच उद्दिष्ट ठेवून राबवली जात असल्याचं गोयल यांनी सांगितलं. परवडणारी घरं, पेयजलाची आणि स्वयंपाकाच्या गॅसची सुविधा, शौचालयांची उपलब्धता आणि शिक्षण या सर्व गोष्टींमुळे असंख्य भारतीयांचं जीवनमान सुधारलं असल्याचं त्यांनी नमूद केलं. सरकारची विचारसरणी मानवतावाद आणि मानवाच्या सर्वांगीण विकासावर केंद्रित आहे, असं गोयल म्हणाले. जगातल्या कोणत्याही देशात गेल्या काही वर्षांत आलेल्या कोणत्याही आरोग्यविषयक समस्येकडे भारतानं प्रथम मदतीचा हात पुढे केला आहे, याचा गौरवपूर्ण उल्लेखही गोयल यांनी यावेळी केला.

**<u>इराणस्फोट</u>**

इराणच्या दक्षिणेकडील बंदरअब्बास या शहरानजीकच्या शाहीद राजाई बंदरात झालेल्या शक्तिशाली स्फोटात मरण पावलेल्यांची संख्या आता ४० झाली आहे. शनिवारी झालेल्या या स्फोटानंतर लागलेल्या आगीत एक हजाराहून अधिक जण जखमी झाले आहेत. त्यापैकी १९७ जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या स्फोटाचं नेमकं कारण अद्याप समजू शकलेलं नाही. दरम्यान या स्फोटात झालेल्या जीवितहानीबद्दल इराण सरकारनं आज एक दिवसाचा दुखवटा जाहीर केला आहे.

**<u>आशियाईयोगासनस्पर्धा</u>**

दिल्लीमध्ये काल झालेल्या आशियाई योगासन अजिंक्यपद स्पर्धांमध्ये भारतानं निर्विवाद वर्चस्व राखत 83 सुवर्ण पदकांची कमाई केली. दुसरं स्थान मिळवणाऱ्या  जपानच्या खात्यात 3 सुवर्ण, 3 रौप्य आणि 4 कास्यपदकं जमा झाली. 21 देशांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेटमध्ये काल रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघानं दिल्ली कॅपिटल्स संघाचा 6 गडी राखून पराभव केला. दिल्ली कॅपिटल्स संघानं ठेवलेलं 163 धावांचं आव्हान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघानं 9 चेंडू राखून पार केलं. आयपीएल क्रिकेटच्या दुसऱ्या सामन्यात मुंबईमध्ये, मुंबई इंडियन्स संघानं लखनौ सुपर जायंट्स संघावर 54 धावांनी मात केली. मुंबई इंडियन्स संघानं ठेवलेल्या 216 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनौ सुपर जायंट्स संघ 161धावाच करू शकला. जयपूरमध्ये आज राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात लढत होणार आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.